महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३७ वे | दिनांक : २३/०८/२०२६ | वार : रविवार


## आवाज उठवा, अभिमानाने बोला, आणि स्वत:साठी लढा : राहुल गांधींचे विद्यार्थिनींना आवाहन



**पुणे :** शनिवारी 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात राहुल गांधी म्हणाले, "देशातील मुली स्वतंत्र असणे महत्त्वाचे आहे. तुमचे तुमच्या वडिलांशी, पतीशी आणि मुलाशी नाते असते, पण तुमची ओळख त्यांच्यासोबत नाही." ते म्हणाले की, मनुस्मृती सांगते की मुलगी ही तिच्या वडिलांची, पतीची आणि मुलांची मालमत्ता आहे. हे लज्जास्पद आहे. महिला स्वतंत्र असल्या पाहिजेत. त्याकोणावरही अवलंबून नाहीत. राहुल गांधी म्हणाले, "महिलांवरील हिंसाचाराचे तीन प्रकार आहेत. पहिला, जन्मावेळी हत्या, दुसरा, शारीरिक छळ आणि तिसरा, आर्थिक निर्बंध." या कार्यक्रमासाठी केवळ विद्यार्थिनींना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी 'राहुल-राहुल' च्या घोषणा दिल्या. खट्टरजी म्हणतात की बलात्कार स्त्रियांमुळे होतो. ही एक मानसिकता आहे. मुलीचे एक स्थान आहे; तिला पिंजऱ्यात बंद केले पाहिजे. मुलांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. ते गैरवर्तन करू शकतात, काम करू शकतात आणि मोकळेपणाने फिरू शकतात. आम्हाला असा भारत नको आहे. तुमच्या मनातील भीती लवकरात लवकर दूर केली पाहिजे. तुम्ही या देशाचा पाया आहात, तुम्ही भविष्य आहात ... जर पुरुषप्रधानता तुम्हाला घाबरवत असेल, दडपत असेल आणि नियंत्रित करत असेल, तर आपण सर्वांनी मिळून ती संपवली पाहिजे. माझा संदेश आहे, आवाज उठवा, अभिमानाने बोला आणि स्वत:साठी लढा. राहुल गांधी म्हणाले- मुलांनी गैरवर्तन करणे ठीक आहे, पण मुलीने गैरवर्तन करणे स्वीकारार्ह नाही. राहुल यांनी मोदी, योगी आणि भागवत यांच्या वक्तव्यांच्या क्लिप्स दाखवल्या. त्याचे शीर्षक होते, "मनुस्मृती परत आली आहे ... " राहुल म्हणाले, "जंतर मंतरवर मुले आणि मुली दोघांनीही गैरवर्तन केले. पण मुलींनी गैरवर्तन केले हे ऐकून आपल्याला सांस्कृतिक धक्का बसला, असे पंतप्रधान म्हणाले. मुलांनी गैरवर्तन करणे ठीक आहे, पण मुलीने गैरवर्तन करणे स्वीकारार्ह नाही." राहुल गांधी म्हणाले- एक मानसिकता आहे, मनुस्मृतीची मानसिकता. एक मुलगी म्हणाली, "एमपीएससी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली आहे. आम्हाला तुमच्याकडून खूपएक मुलगी म्हणाली, "एमपीएससी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली आहे. आम्हाला तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत. कृपया आम्हाला मदत करा." राहुल गांधी पुन्हा प्रेझेंटेशनकडे वळले आणि म्हणाले, "एक मानसिकता आहे. मनुस्मृतीची मानसिकता, स्त्रियांना दडपून टाकण्याची मानसिकता." राहुल गांधी म्हणाले- मुलीवर असलेलं शेवटचं कुलूप म्हणजे वेळ राहुल म्हणाले, "एक २९ वर्षांची स्त्री घरी तासनतास काम करते, तर एक मुलगा फक्त अर्धा तास काम करतो. मुलगा कधीही, संध्याकाळी उशिरा किंवा रात्री बाहेर जाऊ शकतो. पण त्याला एका ठराविक वेळेनंतर आत परत यावंच लागतं." एक मुलगा अनेक परीक्षा देऊ शकतो. पण मुलीला सांगितलं जातं की तिचं लग्नाचं वय झालं आहे आणि त्यामुळे तिने पुढे शिक्षण घेऊ नये. नेहाच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना राहुल म्हणाले, "मलाही अनेक वर्षांपासून शिव्या खाव्या लागत आहेत आणि माझ्यातही काही सुधारणा झालेली नाही." नेहा म्हणाली, "सध्या देशातील अल्पसंख्याकांविरुद्ध एक विशिष्ट चित्र उभे केले जात आहे. मला हे सांगायचे आहे की, 'तुमच्याइतका खोटारडा आणि अप्रामाणिक कोणी नाही. भारत हा कोणाचाही वारसा नाही ... " भोजपुरी गायिका नेहा राठोड मंचावर म्हणाल्या, "तुम्ही सरकारला प्रश्न विचारलात तर तुमच्यावर एफआयआर दाखल होतो." नेहा पुढे म्हणाल्या, "मी भोजपुरी लोकगीते गाते. मी सरकारला प्रश्न विचारते आणि त्या बदल्यात मला अनेक प्रश्नांना आणि एफआयआरला सामोरे जावे लागते. जेव्हा माझे नुकतेच लग्न झाले होते, तेव्हा मी 'काबा इन यूपी' हे गाणे गायले ... तेव्हा पोलीस माझ्या घरी आले. माझे सासरचे लोक म्हणाले, 'तुम्ही कोणत्या प्रकारच्या मुलीशी लग्न केले आहे? रोज नेहा पुढे म्हणाल्या, "मी भोजपुरी लोकगीते गाते. मी सरकारला प्रश्न विचारते आणि त्या बदल्यात मला अनेक प्रश्नांना आणि एफआयआरला सामोरे जावे लागते. जेव्हा माझे नुकतेच लग्न झाले होते, तेव्हा मी 'काबा इन यूपी' हे गाणे गायले ... तेव्हा पोलीस माझ्या घरी आले. माझे सासरचे लोक म्हणाले, 'तुम्ही कोणत्या प्रकारच्या मुलीशी लग्न केले आहे? रोज पोलीस येत आहेत." महिलांना वेगळ्या प्रकारे ट्रोल केले जाते. ते सरळ म्हणतात की तिचे चारित्र्य वाईट आहे. आम्ही मागे हटतो. लोक पाच वर्षांपासून आम्हाला शिव्या देत आहेत आणि मग म्हणतात, 'तुम्हाला इतका त्रास सहन करावा लागला, तरी तुमच्यात काही सुधारणा झाली नाही.'


*10वी, 12वी आणि B.Sc. नंतर काय मार्गदर्शनासाठी संपर्क साधा- प्राचार्य डॉ हसन इनामदार 9405109103 / 8830838903*


## 'भाजपवाला दिसला की कॉलर पकडायची : संजय राऊतांचा हल्लाबोल



**बारामती :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा पुण्यात 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम सुरू असताना, दुसरीकडे बारामती तालुक्यातील मोरगाव येथे ठाकरे गटाच्या शिवसेनेने आयोजित केलेल्या 'रामरक्षा आंदोलना'त खासदार संजय राऊत सहभागी झाले होते. या आंदोलनाला भाजपने विरोध केल्यामुळे भाजप कार्यकर्ते आणि ठाकरे गटाच्या शिवसैनिकांमध्ये जोरदार राडा झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, या तणावपूर्ण वातावरणातच संजय राऊत यांनी भाषण करत उपस्थित शिवसैनिकांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. संजय राऊत म्हणाले, तुम्ही उपस्थित आहात, रामरक्षा म्हणजे रामाचे रक्षण. अयोध्येयत भाजपच्या राजवटीत रामाचे मंदिर लुटण्यात आले. रामाचे अलंकार चोरले, सीतामाईचे मंगळसूत्र चोरले, हजारो कारसेवकांनी बलिदान दिले तेव्हा राम मंदिर उभे राहिले आहे. मात्र, अयोध्येतील या मंदिरातून 1400 कोटी रुपये चोरीला गेले आहेत, या मंदिरात CCTV लावले असताना ही चोरी झाली. ज्या रामाने सत्ता दिली त्या रामाच्या मंदिरात चोरी करताय? असा सवाल राऊत यआणि उपस्थित केला. तसेच उद्धव ठाकरे म्हणाले प्रत्येक जिल्ह्यात रामरक्षा आंदोलन करायचे आहे, असेही त्यांनी सांगितले. भाजपवाला दिसला की कॉलर पकडायची पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, इकडचे नेते सुद्धा आहेत ना त्यांना बोलवायला पाहिजे, त्या आहेत ना भाजपसोबत. पण हे सगळे ढोंगी आहेत. अयोध्येतून परत राम वनवासात जाईल अशी परिस्थिती या भाजपने तिकडे केली आहे. त्यामुळे, भाजपवाला दिसला की कॉलर पकडायची आणि विचारायचं मंदिरात चोरी कोणी केली? असे राऊत यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदेंवर टीका संजय राऊत यांनी पीएम केअर फंडवरून केंद्रावर टीका केली आहे. ते म्हणाले, पंतप्रधान मोदींच्या अकाउंटमध्ये साडे 10 हजार कोटी रुपये आहेत, पीएम केअर फंडमध्ये हा पैसा आहे. बारामतीकरांनो जागे व्हा, खरा राम शोधा. बाळासाहेब म्हणाले होते बाबरी तोडण्यात शिवसैनिक असतील तर आम्हाला त्याचा अभिमान आहे. रामाचे रक्षण करण्याचा खरा अधिकार आपल्याला आहे, मिंदेंच्या लोकांना नाही, असे संजय राऊतांनी म्हटले. यावेळी, शिवसैनिकांनी एकनाथ शिंदेंविरुद्ध घोषणाबाजी केली. तर, (एकनाथ शिंदे चोर है) ही घोषणा गल्ली गल्लीत गेली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे. रामरक्षा आंदोलनात अजित पवार गटाच्या महिला पदाधिकाऱ्याचा गोंधळ मोरगाव येथे ठाकरे गटाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रामरक्षा आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ग्रामपंचायत सदस्या स्वाती शेरे गायकवाड यांनी अचानक घुसून मोठा गोंधळ घातला. त्यांनी ठाकरे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत आंदोलनात व्यत्यय आणला आणि खासदार संजय राऊत यांना थेट प्रश्न विचारण्याची आक्रमक मागणी केली. या वाढत्या तणावानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत संबंधित महिलेला ताब्यात घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


## धार्मिक कार्यातून समाजात संस्कार व एकोपा निर्माण होतो



**कन्नड (अरुण थोरात) :** “आजच्या धकाधकीच्या जीवनात धार्मिक कार्याला अनन्यसाधारण महत्त्व असून, अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात एकोपा, संस्कार आणि सकारात्मक विचारांची निर्मिती होते. तरुण पिढीने धार्मिक तसेच सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज आहे,” असे प्रतिपादन आमदार सौ. संजना हर्षवर्धन जाधव यांनी केले. त्याखेडा ता.कन्नड येथे दि.22 ऑगस्ट रोजी अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित सर्वरोग निदान शिबिरास आ. संजनाताई जाधव यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून गावात निर्माण होणाऱ्या भक्तिमय आणि सामाजिक वातावरणाचे महत्त्व विशद केले. संतांची शिकवण, हरिनामाचा गजर आणि सामूहिक धार्मिक उपक्रम यामुळे समाजाला एकत्र आणण्यासोबतच नव्या पिढीमध्ये संस्कार रुजविण्याचे कार्य होते. त्यामुळे तरुणांनी केवळ धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी न होता सामाजिक कार्यातही पुढाकार घ्यावा, असे आवाहन आमदार जाधव यांनी केले. दरम्यान, अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित सर्वरोग निदान शिबिराच्या कार्यक्रमस्थळी खेडा ग्रामस्थांच्या वतीने गावातील विविध प्रलंबित विकासकामांसंदर्भात आमदार जाधव यांना निवेदने देण्यात आली. यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण, नवीन शाळा खोलीचे बांधकाम तसेच खेडा—चापानेर रस्त्याचे रुंदीकरण या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. खेडा—चापानेर हा गावासाठी अत्यंत महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असून सध्या रस्ता अरुंद असल्याने वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सध्याच्या अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करून प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या रस्त्याचे काम करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. या मार्गावरून विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने रस्त्याचे रुंदीकरण व दर्जेदार रस्त्याचे काम होणे अत्यावश्यक असल्याचे ग्रामस्थांनी आमदारांच्या निदर्शनास आणून दिले. यासोबतच गावाच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध मागण्यांची निवेदनेही आ. जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध विकासकामांच्या मागण्यांबाबत आमदार सौ. संजना जाधव यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. “खेडा गावाच्या विकासाच्या दृष्टीने मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांचा शासन दरबारी पाठपुरावा करून त्या मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्न करू,” असे आश्वासन त्यांनी ग्रामस्थांना दिले.

## बलसुरमध्ये यशस्वी पालक मेळाव्याचे आयोजन



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथील श्री.छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (ता.२२) अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला.अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष गोविंदराव सांळुंके होते. यावेळी संचालक माधवराव पाटील, प्राचार्य सतीश वाकडे,इराप्पा औसेकर, मनिषा बालकुंदे, पा.वामन भोरे आदींची उपस्थिती होती.सीईटी बॅचमधील यशवंत विद्यार्थी राणी ढोणे,सपना जमादार,श्नेया बोंडगे, सुहाना गवंडी , अस्मिता नेलवाडे, प्रगती औसेकर, करण भुरे, विकास बिराजदार, अंकिता चव्हाण, प्रतीक्षा मोरे, श्रेयस जाधव, समर्थ तुरुरे, गजानन राचट्टे, अंशुमन गायकवाड, रूपाली जगताप, अस्मिता पाटील, संस्कृती बुंदगे, संजीवनी मुगळे, अश्विनी सांगवे, संस्कृती अंबुरे, अश्विनी बालकुंदे, समीक्षा रसाळ, प्रीती रणखांब, आदी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना पाटील म्हणाले की, महाविद्यालय विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावी पासून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी, नीट सीईटीचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून यशस्वी व्हावे. अध्यक्षीय समारोप साळुंके यांनी केले. यावेळी प्रा.पी.आर. कांबळे, प्रा. यु. पी. कांबळे, प्रा .एन.टी. तेलंग, इराप्पा औसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक. प्रा. बी.टी. जाधव यांनी तर सूत्रसंचालन प्रा परमेश्वर सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा .वामन भोरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


## 'बा' आणि शब्द...

सांजवेळ झाली होती. डोंगराआड सूर्य लपायच्या तयारीत होता. सगळीकडे लाली फाकली होती. अंधाराने आपले हात पाय पसरायला सुरुवात केली. डोंगराच्या कुशीत वसलेले तीस ते चाळीस उंबऱ्यांचं 'राजापूर' गाव; गावातली सगळी माणसं कष्टकरी ; डोंगरदऱ्याचं गाव, त्यामुळे शेतजमीन कमी. दुसऱ्यांच्या शेतात राबून, रानावनातल्या वस्तू गोळा करून जगणारा गाव. रात्र झाली सगळ्या घरात ...घर कसली झोपड्याच त्या.. सगळ्या झोपड्यांत चुली पेटल्या. चिमणीचा अंधुक प्रकाश पसरायला लागला . मिनीने सुद्धा आपल्या झोपडीतला दिवा लावला. अंगण झाडले . मिनाक्षी ९-१० वर्षाची चुणचुणीत मुलगी. तिची आई आणि बा म्हणजेच रखमा आणि महादू शेजारच्या गावात रोजंदारीवर कामाला जात असत. आज सुध्दा ते कामाला गेले होते. मिनी ने चूल पेटवली पाणी तापायला ठेवलं.भाकरीचे पीठ काढलं. सगळी काम ती भरभर करत होती. काम करता करता तिचं लक्ष सतत वाटेकडे लागल होत. तिने कित्येकदा बाहेर येऊन रस्ता न्याहळला. ती तिच्या आईची व बाची वाट पाहत होती. रोजच वाट पाहायची. पण आज विशेष कारण होतं... तिच्या बा ने तिला एक शब्द दिला होता. हो शब्दच! आज बा रानातून येताना तिच्यासाठी वही आणि पेन आणणार होता. मिनी गावातल्या शाळेत जात होती सगळ्या मुलांकडे नवीन वह्या होत्या. छान छान पेन होते. पण मिनीकडे मात्र यातलं काहीच नव्हतं. ती रोज महादू मागं टुमनं लावत होती वही पेन आणण्यासाठी आणि महादू तिला कसंबसं समजवत होता. रखमाचं मात्र म्हणणं होतं की तिला कामाला न्यावं ; तेवढंच घरात चार पैसे येतील. पण महादूचा मात्र तिचं शिक्षण बंद करायला विरोध होता . पोटाला चिमटा काढून तो कसाबसा संसाराचा गाडा हाकत होता. रोजच्या खाण्याची भ्रांत असलेल्या महादूला मिनीची मागणी मान्य करणं अवघड होतं, पण आज मात्र त्यानं तिला 'वही पेन आणणारच' असं आश्वासन दिलं होतं. आज मिनी खूप खुश होती. कधी एकदा बा येतो आणि तिची वही पेन तिला मिळतोय असं तिला झालं होतं. सांज जाऊन रात्र झाली. अंधाराने आपला विळखा अजून घट्ट केला. मिनी कित्येक वेळा बाहेर येऊन गेली. आज रखमाला व महादूला नेहमीपेक्षा जास्त वेळ लागला होता .शेवटी ती अंगणात येऊन बसली. तिने चुलीवर कालवण टाकलं आणि भाकरी थापायला परात घेतली. तेवढ्यात लांबून बैलगाडीचा आवाज आला. मिनी रस्त्याकडे धावली आणि समोरचं दृश्य पाहून जागीच थबकली. बैलगाडी घेऊन शेजारचा रामूकाका येत होता. रखमा म्हणजेच तिची आईची रडून रडून वाईट अवस्था झालेली तीनं पाहिली आणि तिचा बा तिला कुठे दिसत नव्हता. तिने रखमाला हंबरडा फोडून विचारल," आये बा कुठय?" तिच्या हंबरड्याने रखमा भानावर आली. मिनीला उराशी धरून तिने घडलेला प्रकार सांगितला . महादूला काम करताना विजेचा धक्का बसून लकवा मारला. एक बाजू पूर्ण निकामी झाली होती. महादू थोडक्यात वाचला होता. त्याला तालुक्याच्या गावी दवाखान्यात दाखल केले होते. आपल्या 'बा'ची अवस्था ऐकून मिनी बावरून गेली आणि धाय मोकलून रडत जागेवरच कोसळली. दुसऱ्या दिवशी सकाळी रखमा उठली. घरातली काम भराभर उरकली. घर , काम उरकून महादूकडे दवाखान्यात सुद्धा जायचे होते . त्यामुळे तिचे हात भरभर चालत होते. तिने मिनीला आवरायला सांगितले. आईने सांगितल्याप्रमाणे मिनी सगळी काम उरकत होती. काम करत असताना तिला महादूची पिशवी दिसली. तिने लगबगीने पिशवी उघडली त्यात तिला वही आणि पेन दिसला. ती त्या वही आणि पेन कडे पाहत राहिली. तिला तिचा बा आणि शाळा दोन्ही दिसत होते. तेवढ्यात रखमाने जोरात तिच्या हातातीन वही हिसकावून घेतली आणि तिच्या हातात खुरप दिलं. "चल कामावर चार पैकं मिळतील ह्यानं " असं म्हणून तिला बाहेर काढलं. मिनी त्या खुरप्याकडे निःशब्द होऊन तिथेच पाहत उभी राहिली. कितीतरी वेळ ....तेवढ्यात तिच्या बा ला तिने दिलेला शब्द तिला आठवला ...."बा, काही झालं तरी मी शाळा सोडणार नाही" तिने परत जाऊन महादूच्या पिशवीतला वही व पेन घेतला. आता तिच्या हातात खुरपं होतं आणि वहीसुद्धा आणि डोळ्यात एक वेगळीच चमक!




**सौ. ज्योती मुकुंद पोकळे,**
**शिशुविहार प्राथमिक शाळा,**
**एरंडवणा,**
**पुणे.भ्र.९७६३३६६८६६**


## आपण प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग समाज विकासाभिमुख व्हावा - प्राचार्य डॉ विश्वास कदम



**पाटोदा (प्रतिनिधी) :** आपण प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग समाज विकासाभिमुख व्हावा ! असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. व बी.एस्सी. पदवीधारक विद्यार्थ्यांच्या पदवी वितरण समारंभ प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते.या समारंभास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्री.शिवाजीराव पंडित कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते.यावेळी महाविद्यालयातील बी.ए. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या पदवीधारक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. पदवी प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून येत होते.प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "पदवी ही केवळ शिक्षण पूर्ण केल्याची पावती नसून भविष्यातील जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याची प्रेरणा आहे," असे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, तसेच बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाताना सातत्याने नवनवीन ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेत, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव आपल्या कार्यातून उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.समारंभाच्या निमित्ताने महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पदवी वितरणाचा हा अविस्मरणीय क्षण विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांसाठीही अभिमानाचा ठरला.या प्रसंगी विद्यापीठ ध्वजासह पाहुणे व पदवीधर विद्यार्थी यांची रॅली काढुन वातावरण निर्मीती करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी कल्याण विभाग व परीक्षा विभागाच्या वत्तीने करण्यात आले होते.या पदवी वितरण समारंभाचे संचलन विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ. कल्पना घारगे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी मानले.हा समारंभ यशस्वी करण्यासाठी प्रा.सोमनाथ घाडगे,प्रा. डॉ.सुनिल जाधव व प्रा. डॉ.प्रविण शिलेदार आदिनी अथक परिश्रम घेतले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात कार्यरत असलेले इतिहास विषयाचे अभ्यासक प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांच्या मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीचे विश्लेषण या पुस्तकाचे एका भव्य अशा पदविग्रहण समारंभात श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.दामोदर काका पतंगे यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यावेळी प्रवर्तन मंचावर श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.गुलाब राठोड,भाष्यकार प्रा.डॉ.आशिया चिशती या होत्या.या ग्रंथावर भाष्य करताना अभ्यासिका प्रा. डॉ. आसिया चिश्ती म्हणाल्या की मराठवाड्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासामध्ये मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. विद्यापीठाच्या नामांतराचा हा प्रश्न केवळ एका संस्थेच्या नावापुरता मर्यादित नव्हता तर तो सामाजिक न्याय , समता, अस्मिता आणि परिवर्तनाच्या व्यापक विचाराशी जोडलेला संघर्ष होता. या ऐतिहासिक चळवळीचा विविध अंगानी अभ्यास करून प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी खरे तर एक संदर्भग्रंथ सिद्ध केला आहे, येणाऱ्या पिढीसाठी तो सतत मार्गदर्शन करत उपयुक्त सिद्ध होईल यात मला तरी तिळमात्र शंका नाही असे सांगत हा ग्रंथ मराठवाड्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक आंदोलनाचा वैविध्यपूर्ण गमक ठरेल असे सुतोवाच केले. कार्यक्रमातील या टप्प्याचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी केले तर भावपूर्ण मनोगत व्यक्त करत स्वतः लेखक डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


## मनासारखे घडत नसते

आयुष्याच्या संध्याकाळी,
सारे मार्ग बिकट दिसतात.
ज्यांच्यासाठी राबले होते,
तेच अपमान करून हसतात. १

आयुष्याच्या संध्याकाळी,
पाहू नये कोणाचीच वाट,
कोणीच घेऊन येणार नाही,
तुझ्यासाठी सुखाची लाट. २

आयुष्याच्या संध्याकाळी,
सारेच देत असतात त्रास.
कशाला बाळगतो खंत,
कोणीच नाही तुझे खास. ३

आयुष्याच्या संध्याकाळी,
जीवन आनंदात जगावे.
मागे वळून पाहता पाहता,
आपल्याच मनाशी लढावे. ४

आयुष्याच्या संध्याकाळी,
कर्माचे हिशोब करत बसावे.
हिशोब जुळलेच नाही तर,
स्वतःवर स्वतःच हसावे. ५

आयुष्याच्या संध्याकाळची
वाट कशाला पहात बसतो.
सर्वांसाठी जीवन जगतांना,
तूच त्याग करताना दिसतो. ६

आयुष्याच्या संध्याकाळी,
मनासारखे घडत नसते.
कुटुंबासाठी जगता जगता,
स्वतःसाठी जगायचे असते. ७

आयुष्याच्या संध्याकाळी,
भूतकाळ आठवत असते.
वर्तमानात तुझ्यासाठी,
कोणीच थांबणार नसते. ८

आयुष्याच्या संध्याकाळी,
जगण्याचा सोहळा व्हावा.
कुटुंबासाठी जगतांना तू,
सदा स्वतःवर लक्ष द्यावा. ९

आयुष्याची संध्याकाळ,
भूतकाळाला खुणावते.
सर्वांसाठी राबूनसुद्धा,
सुखी जीवनासाठी दुरावते. १०



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# कारवाईच्या लेखी आश्वासनानंतर अरुण गायके यांचे उपोषण स्थगित




**कन्नड (अरुण थोरात) :** रेल ता.कन्नड शिवारातील शासकीय व देवस्थान इनाम जमिनीवरील अतिक्रमण हटवून या अतिक्रमणास संरक्षण देणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी व तलाठी यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी डोंगरेश्वर महादेव मंदिर समितीचे अध्यक्ष अरुण गायके यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सुरु केलेले अन्नत्याग आंदोलन (उपोषण) दि.२२ ऑगस्ट रोजी उपोषणाच्या पाचव्या दिवशी नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे, रेलचे तलाठी सोनवणे आणि कन्नडचे तलाठी दिपक एरंडे यांच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित केले आहे. यावेळी नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांनी अरुण गायके यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच ग्राम पंचायत अधिकारी व तलाठी यांना दि. १७ ऑगस्ट रोजी कन्नड तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांनी लेखी आदेश देऊनही कारवाई का केली नाही या प्रकरणी दि. २५ ऑगस्ट रोजी त्यांची चौकशी केली जाईल. यावेळी डोंगरेश्वर महादेव मंदिर समितीचे पदाधिकारी आणि रेल, कणकावतीनगर,हतनूर,आलापूर, उपळा आणि मकरणपूर येथील भाविकांसह नागरिकांची उपस्थिती होती.

# खेडा येथे भव्य आरोग्य व मोफत नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न



**खेडा :** अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने खेडा, ता. कन्नड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र हतनूर व लायन्स आय हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य व मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. जय हिंद फाउंडेशनच्या आयोजनातून झालेल्या या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात ग्रामस्थांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना आपल्या गावातच विविध आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी, आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार, आवश्यकतेनुसार रक्त तपासणी तसेच ECG तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर लायन्स आय हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.ग्रामीण भागात अनेक नागरिक विविध कारणांमुळे नियमित आरोग्य तपासणी करून घेत नाहीत. त्यामुळे अशा आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून आजारांचे प्राथमिक टप्प्यात निदान होण्यास मदत होते. विशेषतः रक्तदाब, मधुमेह, हृदयविकाराशी संबंधित समस्या तसेच डोळ्यांच्या विकारांची तपासणी एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.अखंड हरिनाम सप्ताहासारख्या धार्मिक उपक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड देत आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराचे ग्रामस्थांनी कौतुक केले. 'आरोग्याची काळजी आज घ्या, निरोगी आयुष्याची सुरुवात करा' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.दरम्यान, अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने गावात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजोपयोगी उपक्रम राबविल्याने सप्ताहाला सामाजिक संवेदनशीलतेचीही जोड मिळाली.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र हतनूर, लायन्स आय हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर, जय हिंद फाउंडेशनचे पदाधिकारी, आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय पथक तसेच खेडा ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.धार्मिक परंपरेसोबत सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेचा उपक्रम राबविणारे हे शिबिर खेडा ग्रामस्थांसाठी निश्चितच उपयुक्त व कौतुकास्पद ठरले.

## आमची म्हैस

काळ्या रंगाची
म्हैस आमची छान
नदीत डुंबते
हरपून देहभान

दही,खवा,तूप
दुधापासून बनते
आपल्या आरोग्याला
निरोगी ठेवते

आम्ही रोज जपतो
तिला जीवापाड
उत्पन्नात होते मग
भरघोस वाढ

हट्टीला आली की
दूर दूर पळते
दमून थकली की
चिखलात लोळते

भूक लागली की
चरते रान
शेतकरी दादाची
जीव की प्राण



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


**प्रवेश सुरू**

**बी.ए.** मराठी व उर्दू माध्यम

**एम.ए** मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

**बालसंगोपन**

**डीप्लोमा गांधी विचार**

**मानवी हक्क प्रमाणपत्र**

**संपर्क**

**9405109103**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


## श्री संत सावता माळी महाविद्यालयात वाणिज्य शाखेचा विद्यार्थी उदबोधन वर्ग संपन्न



**फुलंब्री :** श्री संत सावता माळी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. यावेळी बोलत असताना प्रा.डॉ. महेश थोरात यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना महाविद्यालय व वाणिज्य विभागाच्या शैक्षणिक कार्याबद्दल माहिती देत असताना भविष्यातील संधी यावर प्रकाश टाकत वाणिज्य विभागातील माजी विद्यार्थी कसे यशस्वी झाले. आणि सध्या चांगल्या ठिकाणी काम करत आहेत. याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला.या उदबोधन वर्गासाठी ५० ते ५५ विद्यार्थी उपस्थित होते.याप्रसंगी प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, प्रा. डॉ. स्वप्नील कुलकर्णी, प्रा. भाग्यवंत, प्रोफेसर डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रोफेसर डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रोफेसर डॉ. राजश्री पवार, प्रोफेसर डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रोफेसर डॉ. विजय पांडे, प्रोफेसर डॉ. रामकिशन लोमटे, प्रोफेसर डॉ. दत्तात्रय येडले, प्रोफेसर डॉ. सुरेश मुंढे, प्रोफेसर डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे, प्रा. भारत कुबेर, प्रा. निर्मला वाघ, प्रा. चंद्रनयन वाघमारे, प्रा. अरुण परदेशी, प्रा. रवींद्र चेपटे, प्रा. स्वाती चनखोरे, प्रा. अंभोरे यांची उपस्थिती होती.

## तिरंग्याच्या रंगांत रंगले बालमन; इकरा पब्लीक स्कूलमध्ये रंगभरण स्पर्धेचा जल्लोष!




**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज,जळगाव येथे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी उत्साहपूर्ण रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत करण्यासोबतच त्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना वाव देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.हिरवाईने नटलेल्या आणि डोंगररांगांच्या रमणीय पार्श्वभूमीवर असलेल्या शाळेच्या निसर्गरम्य परिसरात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांना तिरंगा आणि विविध देशभक्तीपर विषयांवरील चित्रांच्या रूपरेषा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी त्यामध्ये विविध रंग भरून आपल्या कल्पकतेचे आणि कलात्मक कौशल्याचे सुंदर दर्शन घडविले.चित्रकला शिक्षक शफीक अंसारी तसेच कला विभागातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा उत्साहात पार पडली.विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कलाकृतींमधून देशप्रेमाची भावना व्यक्त केली.प्राचार्य शेख शकील यांनी विद्यार्थ्यांचे कलागुणांचे कौतुक केले व उत्स्फूर्त सहभागाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.या उपक्रमाचे कौतुक करताना शाळेचे चेअरमन डॉ. अब्दुल करीम सालार यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुण ओळखून त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी इकरा पब्लिक स्कूल सातत्याने विविध उपक्रम राबवत असते.रंग, सर्जनशीलता आणि देशप्रेमाच्या सुंदर संगमाने ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरली.

## माय-बाप गेल्यानंतरची गोष्ट

माय बाप गेल्यानंतर
संपली नाही गोष्ट
तर आत्माच हरवला
गोष्टीतला...

अन् गोष्ट
गोष्ट कुठं राहिली?
तर त्या गोष्टीतल्या
चुकल्या साऱ्या दिशा
अन् वागू लागले पात्र
दिशाहीन वाऱ्यासारखे बेभान..

आबाळ झाली
गोष्टीतल्या जिंदगानीची
पोरकेपणाचा शिक्का लागल्यापासून..

त्या गोष्टीतलं
गाव अन् आभाळ ही
हरवलं आता
ती गोष्ट उन्हात पडल्यापासून..

गोष्टीतलं लेकरू
मोठ झालंय
जगाच्या नजरेत आताशा
ते लहान असून ही..

आता
रडण्याचा.. रुसण्याचा
करत नाही ते विचार
स्वप्नातही..
होरपळ सोबतीला आल्यापासून..

आता डोळ्यांतल्या घागरी
वाहत असतात नकळत
कधीही केव्हाही..

अन् माय बापानं
लिपलेल्या नात्यानं
धरलेय पोपडे..

भिंतीवरील
माय अन् ममतेचे
रंग उडून गेले..

अन् घराचं घरपण ही हरवलं
तरी गोष्ट चालू आहे..

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# गुंजोटी येथे पदवीदान सोहळा उत्साहात



**गुंजोटी (प्रा.नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आज विद्यार्थ्यांचा पदवीदान वितरण सोहळा अतिशय उत्साहात आणि हर्षोल्हसात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर काका पतंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.अंकुश कदम ,अधिसभा सदस्य प्रा. डॉ.सतीश गावित , विद्या परिषद सदस्य प्रा.डॉ. जगदीश नन्नवरे ,श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड ,श्रीमती विभावरी विजय शाहीवाले, श्रीमान प्रभाकर नारायण हिरवे ,श्रीमती मंदाकिनीताई गोपाळराव पाटील ,डॉ. श्याम नागय्या इबते,श्रीमान सुरेश महाजी देसाई ,डॉ. सागर रत्नाकर पतंगे, श्रीमान संघया स्वामी, श्रीमान सुधाकर रामराव सूर्यवंशी, श्रीमती वैशाली चंद्रशेखर कदेरे ,श्रीमान अभय कुमार हिरास यांचे प्रमुख उपस्थिती होती .यावेळी प्रा. डॉ.अंकुश कदम प्रमुख पाहुणे डॉ.ज्ञानेश्वर पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आमच्या वेळी तुमच्यासारख्या शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध नव्हत्या ,पण आज तुमच्यासमोर ज्ञानाचे भांडार आहे पण त्याचा उपयोग तुम्ही करून घेतला पाहिजे ,नुसती पदवी संपादन करून चालणार नाही तर इतर क्षेत्रातील कौशल्य आपल्याला आत्मसात करावे लागेल. तर आणि तरच यश तुम्हाला गवसणी घालेल. वर्गात उपस्थित राहायचे विद्यार्थ्यांचे प्रमाण आज अल्प झाले असले तरी इतर अनेक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्याला कौशल्य विकसित करता येते .कौशल्यावर आधारित स्वतःला समृद्ध करणे हेच आजचे युवकासमोरील प्रमुख आव्हान आहे असे सांगून पदवी संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुण्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी केले तर कार्यक्रमाचे देखणे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.आशिया चिस्ती यांनी केले कार्यक्रमाचे सविस्तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांनी केले तर डॉ.दामोदर काका पतंगे यांच्या वतीने अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ.आर्यन निगडे यांनी केला ,राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होती.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


## ज्ञानातून समतेची वाटचाल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा गौरवशाली प्रवास

२३ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली आणि या प्रदेशाच्या उच्च शिक्षणाच्या इतिहासात एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला. पुढे १४ जानेवारी १९९४ रोजी या विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' ही ओळख अधिक दृढ झाली. त्यामुळे विद्यापीठाचा वर्धापनदिन हा केवळ एका शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेचा स्मृतिदिन नाही, तर ज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन, समता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांना बळ देण्याचा संकल्पदिन आहे. २३ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठाचा ६८ वा वर्धापनदिन साजरा होत असताना गेल्या सहा दशकांहून अधिक काळातील या ज्ञानसंस्थेच्या वाटचालीकडे अभिमानाने पाहतानाच तिच्या भविष्यातील जबाबदाऱ्यांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या आकांक्षांना आकार देणारे हे विद्यापीठ आज केवळ एक शैक्षणिक केंद्र राहिलेले नाही, तर ज्ञान, संशोधन, सामाजिक जाणीव आणि परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे.मराठवाड्याच्या सामाजिक इतिहासाचा विचार केला तर या प्रदेशात उच्च शिक्षणाच्या सुविधांची कमतरता दीर्घकाळ जाणवत होती. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हैदराबाद संस्थानाचा भाग होता. त्या काळात उच्च शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. परिणामी, उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना दूरच्या शहरांमध्ये जावे लागत असे. आर्थिक परिस्थिती, सामाजिक विषमता, भौगोलिक अंतर आणि मर्यादित शैक्षणिक साधने यांमुळे सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी सहज उपलब्ध होत नव्हती. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही, सामाजिक न्याय आणि विकासाची नवी दिशा स्वीकारली. शिक्षण हे व्यक्तीच्या उन्नतीचे आणि समाजाच्या परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही जाणीव अधिक दृढ झाली. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रदेशातच उच्च शिक्षणाची सक्षम व्यवस्था असणे गरजेचे आहे, अशी मागणी समाजातील शिक्षणप्रेमी, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून पुढे आली. त्यामुळे स्वतंत्र विद्यापीठाची मागणी ही केवळ प्रशासकीय सुविधेची मागणी नव्हती; ती मराठवाड्याच्या शैक्षणिक स्वाभिमानाची आणि ज्ञानाच्या समान अधिकाराची मागणी होती.मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन व्हावे यासाठी अनेक वर्षे प्रयत्न झाले. अखेरीस २३ ऑगस्ट १९५८ रोजी विद्यापीठाची स्थापना झाली. मराठवाड्याच्या शैक्षणिक इतिहासातील हा क्षण अत्यंत महत्त्वाचा ठरला. उच्च शिक्षणाच्या अभावामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याच्या दिशेने टाकलेले हे ऐतिहासिक पाऊल पुढील अनेक दशकांतील सामाजिक परिवर्तनाचा पाया बनले.विद्यापीठाची सुरुवात आजच्या तुलनेत अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून झाली. त्या काळात आजच्यासारख्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. मात्र ज्ञाननिर्मितीची जिद्द, शिक्षकांची बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या आकांक्षा यांमुळे विद्यापीठाची वाटचाल सातत्याने सुरू राहिली. कालांतराने विद्यापीठाचा परिसर विस्तारला, विविध विद्याशाखा आणि विभागांची निर्मिती झाली, ग्रंथालय समृद्ध झाले, प्रयोगशाळा आणि संशोधन सुविधा वाढल्या आणि विविध ज्ञानशाखांमध्ये अध्यापन व संशोधनाला चालना मिळाली. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विविध भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. एका मर्यादित सुरुवातीपासून व्यापक शैक्षणिक परिवारापर्यंत झालेला हा प्रवास म्हणजे मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासाची एक महत्त्वपूर्ण कहाणी आहे.या विद्यापीठाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे नामविस्तार होय. १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले. या नामकरणाने विद्यापीठाची ओळख केवळ एका महान व्यक्तिमत्त्वाशी जोडली गेली नाही, तर समता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि शिक्षणाच्या परिवर्तनकारी शक्तीशीही ती दृढ झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी साधन मानले. अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता आणि अन्याय यांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी ज्ञान आणि विवेक आवश्यक आहेत, असा त्यांचा ठाम विश्वास होता. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजही सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला दिशा देणारा आहे. त्यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठाची जबाबदारी त्यामुळे केवळ पदवी प्रदान करण्यापुरती मर्यादित राहू शकत नाही. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबर विवेक, सामाजिक बांधिलकी, संविधानिक मूल्यांची जाणीव आणि मानवी संवेदनशीलता निर्माण करणे ही या विद्यापीठाची व्यापक जबाबदारी आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन आजच्या काळात अधिकच प्रासंगिक आहे. शिक्षण म्हणजे केवळ माहितीचे संकलन किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्याचे साधन नव्हे. शिक्षण माणसाला प्रश्न विचारण्याची क्षमता देते, रूढी-परंपरांचे चिकित्सक परीक्षण करण्याची दृष्टी देते आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बौद्धिक सामर्थ्य निर्माण करते. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते आणि जबाबदाऱ्यांचे भानही प्राप्त होते. त्यामुळे विद्यापीठ हे केवळ परीक्षा, पदव्या आणि प्रमाणपत्रांचे केंद्र न राहता विचारनिर्मितीचे, संशोधनाचे, मुक्त संवादाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र असले पाहिजे. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख ज्ञान आणि कौशल्ये देतानाच त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्यांची निष्ठा, सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे. विद्यापीठाच्या नावामागील विचारधारा आणि प्रत्यक्ष शैक्षणिक कार्य यांच्यातील सुसंवादातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा खरा सन्मान होऊ शकतो.मराठवाडा हा इतिहास, संस्कृती, साहित्य आणि लोकपरंपरांनी समृद्ध प्रदेश आहे. अजिंठा-वेरूळच्या ऐतिहासिक वारशापासून संतपरंपरेपर्यंत, लोककलेपासून आधुनिक साहित्यापर्यंत आणि विविध समाजघटकांच्या जीवनपद्धतींपासून सामाजिक चळवळींपर्यंत या प्रदेशाचे सांस्कृतिक विश्व अत्यंत व्यापक आहे. या वारशाचा शास्त्रीय अभ्यास, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत हस्तांतरण करण्यात विद्यापीठाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. विविध ज्ञानशाखांमधील अध्यापन आणि संशोधनामुळे विद्यापीठाच्या ज्ञानविश्वाला व्यापकता प्राप्त झाली आहे. मराठवाड्याच्या सामाजिक वास्तवाचे चिकित्सक आकलन करून घेणे आणि त्या वास्तवावर आधारित ज्ञाननिर्मिती करणे ही या विद्यापीठाची विशेष ओळख ठरू शकते.विद्यापीठाच्या स्थापनेचा सर्वांत व्यापक परिणाम म्हणजे मराठवाड्यात उच्च शिक्षणाचा झालेला सामाजिक विस्तार. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना पदवी, पदव्युत्तर आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध झाल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या परिसराच्या जवळ राहून उच्च शिक्षण घेण्याचा मार्ग खुला झाला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण, वंचित आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळाला. अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणला. शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, वकील, पत्रकार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिक म्हणून विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी आपले योगदान दिले. त्यामुळे विद्यापीठाचा प्रभाव केवळ विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीपुरता मर्यादित राहिला नाही; त्याने कुटुंबे, समाजघटक आणि संपूर्ण प्रदेशाच्या विकासप्रक्रियेला चालना दिली.उच्च शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. एका व्यक्तीला मिळालेले शिक्षण अनेकदा संपूर्ण कुटुंबाच्या पुढील पिढ्यांच्या जीवनाला दिशा देते. शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढतात, निर्णयक्षमता विकसित होते, आत्मविश्वास निर्माण होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होते. विशेषतः ग्रामीण आणि वंचित समाजघटकांसाठी उच्च शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे महत्त्वाचे माध्यम ठरते. मराठवाड्यातील अनेक युवक-युवतींनी पारंपरिक सामाजिक आणि आर्थिक मर्यादा ओलांडून शिक्षणाच्या माध्यमातून नव्या संधी प्राप्त केल्या. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमुळे कुटुंबांच्या अपेक्षा बदलल्या, पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आणि समाजात नव्या नेतृत्वाचा उदय झाला. या व्यापक प्रक्रियेला संस्थात्मक आधार देण्यात विद्यापीठाची भूमिका निःसंशय महत्त्वाची आहे.आजच्या बदलत्या काळात उच्च शिक्षणासमोर नव्या स्वरूपाची आव्हाने उभी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, स्वयंचलितीकरण, जागतिकीकरण, माहितीचा प्रचंड वेग आणि बदलती रोजगारव्यवस्था यामुळे शिक्षणाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान देणे आता पुरेसे राहिलेले नाही. चिकित्सक विचार, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, डिजिटल साक्षरता, संवादकौशल्य, संशोधनवृत्ती, उद्योजकता आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता या आजच्या शिक्षणाच्या आवश्यक बाबी आहेत. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना मानवी मूल्ये आणि सामाजिक संवेदनशीलता यांची उपेक्षा होऊ नये. तंत्रज्ञान हे शिक्षण अधिक प्रभावी बनविण्याचे साधन आहे; परंतु शिक्षणाचे अंतिम ध्येय विवेकी, संवेदनशील, नैतिक आणि जबाबदार नागरिक घडविणे हेच असले पाहिजे. आधुनिक ज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा समतोल साधणे हे आगामी काळातील विद्यापीठाचे महत्त्वाचे आव्हान आहे.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षणात आंतरशाखीय शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधन, नवोपक्रम, लवचिकता आणि स्थानिक ज्ञानाचा आधुनिक ज्ञानाशी संवाद यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने या बदलांचा स्वीकार करताना मराठवाड्याच्या स्थानिक गरजांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. जागतिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करताना स्थानिक सामाजिक प्रश्नांवर संशोधन करणे ही या विद्यापीठाची विशेष जबाबदारी आहे. मराठवाड्यातील दुष्काळ, पाणीटंचाई, शेती, शेतकरी प्रश्न, ग्रामीण बेरोजगारी, स्थलांतर, महिलांचे सक्षमीकरण, आदिवासी समाज, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, युवकांचे प्रश्न, ग्रामीण शिक्षण, आरोग्य, डिजिटल दरी, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय समस्या या विषयांवर व्यापक आणि आंतरशाखीय संशोधनाची गरज आहे. विद्यापीठातील संशोधन समाजाच्या प्रत्यक्ष प्रश्नांशी जोडले गेले तर ज्ञाननिर्मितीला अधिक व्यापक सामाजिक अर्थ प्राप्त होईल.विद्यापीठ आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याची आज नितांत गरज आहे. विद्यापीठात निर्माण होणारे ज्ञान केवळ शैक्षणिक वर्तुळात मर्यादित न राहता ग्रामीण आणि वंचित समाजघटकांपर्यंत पोहोचले पाहिजे. ग्रामविकास, आरोग्यजागृती, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता, महिला सक्षमीकरण, युवक कौशल्यविकास आणि सामाजिक जागृतीच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविला पाहिजे. समाजाच्या प्रत्यक्ष समस्यांचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता निर्माण होते आणि त्यांच्या शिक्षणाला व्यवहार्य अर्थ प्राप्त होतो. विद्यापीठाच्या भिंतींच्या आत निर्माण झालेले ज्ञान समाजाच्या जीवनात उतरले तरच विद्यापीठ खऱ्या अर्थाने समाजाचे ज्ञानकेंद्र ठरते. 'ज्ञान समाजासाठी' ही भावना प्रत्यक्ष कृतीत उतरविणे ही विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी असली पाहिजे.विद्यार्थीकेंद्रित आणि समावेशक शिक्षण ही आधुनिक विद्यापीठाची महत्त्वाची ओळख असली पाहिजे. ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थी, दिव्यांग विद्यार्थी आणि उच्च शिक्षणाच्या पहिल्या पिढीत प्रवेश करणारे विद्यार्थी यांच्यासाठी संवेदनशील आणि समावेशक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी समान नसते. त्यामुळे समान संधींबरोबर गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक आधार देणे ही सामाजिक न्यायाची व्यवहार्य बाजू आहे. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली ठेवणे आणि कोणताही विद्यार्थी आर्थिक, सामाजिक किंवा भौगोलिक कारणांमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे ही बाबासाहेबांच्या विचारांना साजेशी कृती ठरेल.गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक न्याय हे परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठाने उत्कृष्टतेसोबत समावेशकतेलाही समान महत्त्व दिले पाहिजे. जागतिक दर्जाचे संशोधन करताना स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष न करणे, आधुनिक कौशल्ये विकसित करताना मानवी मूल्यांचे संवर्धन करणे आणि स्पर्धात्मक जगासाठी विद्यार्थ्यांना तयार करताना सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे ही विद्यापीठाची खरी कसोटी आहे.वर्धापनदिन हा केवळ गौरवगाथा सांगण्याचा प्रसंग नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. गेल्या ६८ वर्षांत विद्यापीठाने काय साध्य केले, मराठवाड्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासात त्याचे योगदान किती व्यापक झाले, कोणती आव्हाने अद्याप कायम आहेत आणि आगामी काळात विद्यापीठाने कोणती दिशा स्वीकारली पाहिजे, याचा विचार या दिवशी होणे आवश्यक आहे. भूतकाळाचा गौरव हा भविष्याची जबाबदारी स्वीकारण्याची प्रेरणा देणारा असला पाहिजे. इतिहासाचा अभिमान बाळगताना भविष्याचा वेध घेणे हीच वर्धापनदिनाची खरी गरज असली पाहिजे.२३ ऑगस्ट १९५८ रोजी प्रज्वलित झालेली ज्ञानज्योत आज असंख्य विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अधिक व्यापक झाली आहे. या ज्ञानज्योतीला पुढील पिढ्यांपर्यंत अधिक तेजाने पोहोचविणे ही वर्तमान पिढीची जबाबदारी आहे. जागतिक ज्ञानाशी संवाद साधताना आपल्या मातीशी असलेले नाते तुटता कामा नये आणि आधुनिकतेचा स्वीकार करताना मानवी संवेदना हरवता कामा नये. मराठवाड्याच्या प्रश्नांना राष्ट्रीय आणि जागतिक ज्ञानविश्वात स्थान मिळवून देण्याची क्षमता या विद्यापीठात आहे. ज्ञान, संशोधन आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधून विद्यापीठाने पुढील पिढ्यांसाठी नवे आदर्श निर्माण करावेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन म्हणजे शिक्षणाच्या परिवर्तनकारी शक्तीवर विश्वास व्यक्त करण्याचा दिवस आहे. शिक्षणामुळे व्यक्ती सक्षम होते, समाज जागृत होतो आणि लोकशाही बळकट होते. बाबासाहेबांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेतले तर या विद्यापीठाचे अंतिम ध्येय केवळ पदवीधरांची संख्या वाढविणे नसून विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले, संवेदनशील, संविधाननिष्ठ आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडविणे हे असले पाहिजे. शिक्षणातून स्वाभिमान, ज्ञानातून समता, संशोधनातून परिवर्तन आणि संस्कारातून सामाजिक जबाबदारी निर्माण झाली तरच विद्यापीठाच्या स्थापनेमागील व्यापक उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साकार होईल.मराठवाड्याच्या जनतेने ज्या शैक्षणिक स्वप्नातून स्वतंत्र विद्यापीठाची मागणी केली, त्या स्वप्नाचे आज एका व्यापक ज्ञानसंस्थेत रूपांतर झाले आहे. आता या वारशाला नव्या पिढीच्या आकांक्षांशी जोडण्याची वेळ आली आहे. आगामी काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोपक्रम, सामाजिक न्याय, कौशल्यविकास आणि मानवी विकासाच्या क्षेत्रात अधिक व्यापक योगदान द्यावे, अशी अपेक्षा आहे. २३ ऑगस्टचा वर्धापनदिन हा भूतकाळाच्या गौरवाबरोबरच उज्ज्वल भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस ठरावा. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली ठेवत, ज्ञानाचा प्रकाश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवत आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या संविधानिक मूल्यांना बळकटी देत विद्यापीठाची ज्ञानयात्रा अखंड सुरू राहो. मराठवाड्याच्या मातीतील ज्ञान, संघर्ष आणि परिवर्तनाच्या परंपरेला आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड देत हे विद्यापीठ राष्ट्रीय तसेच जागतिक ज्ञानविश्वात अधिक प्रभावी स्थान निर्माण करो, हीच विद्यापीठाच्या ६८व्या वर्धापनदिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत)**

**ईमेल — bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


# कावड यात्रा करण्याने दलितांच्या मुक्तीचा मार्ग खुला होईल ?



एक बालपणीची आठवण मी दहा-बारा वर्षांचा असताना घरापासून काही तासांच्या अंतरावर असलेल्या बिहारमधील गया जिल्ह्यात फल्गू नदी ओलांडल्याची घटना आजही अधूनमधून आठवते. नदीचा प्रवाह इतका वेगवान होता की, माझे डोके पाण्याच्या वर ठेवणेही मला कठीण जात होते. माझ्या पुढे चालणाऱ्या वडिलांनी माझा एक हात घट्ट पकडला होता, तर माझा चुलत भाऊ गौतम दुसरा हात धरून होता. आमच्या आजूबाजूला डझनभर कावडिये चालत होते. त्यात माझ्या वडिलांचा एक मित्रही होता. सर्वजण बांबूला लटकवलेल्या लहान लाकडी पात्रांमध्ये या गंगेच्या उपनदीतून पाणी भरून नेत होते. गयाच्या उत्तरेला असलेल्या बराबर टेकडीवरील एका मंदिरात भगवान शिवाला हे पाणी अर्पण करण्यासाठी आम्ही निघालो होतो.  नदी ओलांडल्यानंतर आम्ही काठाने चालू लागलो. मला ती टेकडी म्हणजे जणू प्रचंड आकाराच्या दगडांचा अस्ताव्यस्त ढीगच वाटत होता. कोणीतरी हे दगड वरून खाली बेफिकिरीने फेकून दिले असावेत, असे मला वाटले. गौतम आणि मी बराच वाद घातल्यानंतर अखेर या दगडांचा संबंध हनुमानाशीच असावा, यावर आमचे एकमत झाले. हनुमान पर्वत उचलू शकत होते आणि ते स्वतः शिवाचेच एक रूप आहेत, असे आम्हाला माहीत होते. आमच्यासाठी ही यात्रा मिथक, श्रद्धा आणि आश्चर्याने भरलेली होती. चढाई करताना आम्ही थकून डगमगू लागलो की मागून ऐकू येणारा “बोल बम!” हा जयघोष आम्हाला पुन्हा पुढे जाण्यास प्रेरणा देत असे. कधी-कधी माझे वडील आणि त्यांचे मित्रही हा नारा देत. ते जाणीवपूर्वक आमच्या मागे चालत होते, जेणेकरून आमच्यावर लक्ष ठेवता येईल. आम्हाला वाटत होते की, त्यांच्यापैकी प्रत्येक जण आमची काळजी घेत आहे. कावडिये एकमेकांना हाक मारताना “बम” हा शब्द वापरतात, हे आम्हाला माहीत होते; परंतु आम्हाला यापूर्वी कोणी अशा प्रकारे संबोधले नव्हते. त्यामुळे आमच्यापैकी कोणाला “बम” म्हणून हाक मारली की आम्हाला क्षणभर आश्चर्य वाटत असे. कावड यात्रेचा इतिहास कावड यात्रेच्या उगमाबाबत पौराणिक किंवा ऐतिहासिक नोंदी फारशा उपलब्ध नाहीत. तिचा एक महत्त्वपूर्ण उल्लेख रॉबर्ट मॉन्टगोमेरी मार्टिन यांनी १८५८ मध्ये प्रकाशित केलेल्या The Indian Empire या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात आढळतो. वसाहतकालीन भारतात नागरी सेवक म्हणून काम केलेल्या मार्टिन यांनी आपल्या लेखनात “कावड” हा शब्द वापरलेला नाही. मात्र, त्यांनी केलेल्या वर्णनावरून ते कावड यात्रेकरूंबद्दलच लिहित होते, हे स्पष्ट होते. मार्टिन यांनी हरिद्वारला भेट दिली होती. आजही हरिद्वार हे कावड यात्रेकरूंचे एक प्रमुख गंतव्यस्थान आहे. त्यांनी लिहिले आहे की, दूरवरून आलेले भाविक आपल्या घरांना पवित्र करण्यासाठी पवित्र जलाने भरलेली भांडी घेऊन जाण्यास उत्सुक असत. ही जलपात्रे अनेकदा फुले आणि पिसांनी सजवलेल्या एका विशिष्ट रचनेला लटकवलेली असत आणि पुरुषांच्या लांबच लांब रांगा ती आपल्या खांद्यावर वाहून नेत असत. हे पाणी अपवित्र होऊ नये याची काळजी घेत ते शेकडो मैलांचा प्रवास करत असत. मार्टिन यांनी धार्मिक आत्महत्येच्या प्रथेचाही उल्लेख केला आहे. काही भक्तांचा असा विश्वास होता की, जे लोक आनंदाने आपले सांसारिक जीवन संपवतात त्यांना अमरत्वाचे वरदान प्राप्त होते. स्वतःचे जीवन संपवण्याचे धैर्य नसल्यास, जवळच्या मित्रांनी त्यांना पवित्र प्रवाहात वाहून जाण्यास मदत करावी, अशी त्यांची अपेक्षा असे. मार्टिन यांनी या प्रथेच्या उगमाविषयी काही सांगितलेले नाही. मात्र, गंगा बंगालच्या उपसागराला मिळते त्या गंगासागरातील एका तत्सम प्रथेचे त्यांनी केलेले वर्णन या प्रथांचा उगम कसा झाला असावा, याची कल्पना देते. येथे प्रौढ व्यक्ती स्वतःचे जीवन संपवण्याऐवजी आपल्या मुलांना पाण्यात फेकत असत. मार्टिन यांच्या मते, अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत गंगासागरात ही बालहत्येची प्रथा सुरू होती. त्यानंतर ब्रिटिश वायसरॉयने ती “दुष्ट प्रथा” बंद केली. मार्टिन यांच्या मते, ब्राह्मण जानेवारी महिन्यात हजारो हिंदूंना या बेटावर एकत्र येण्यास प्रवृत्त करत आणि पालकांना आपल्या मुलांना नदीच्या प्रवाहात फेकण्यास उद्युक्त करत. लोकांच्या “अंधश्रद्धाळू विचारांचा” फायदा घेऊन ब्राह्मण हे घडवून आणत, असे मार्टिन यांनी नमूद केले आहे.गंगेच्या पवित्रतेची कल्पना कावड यात्रेच्या केंद्रस्थानी गंगा आणि तिच्या पाण्याच्या पवित्रतेवरील विश्वास आहे. हा विश्वास आजही मोठ्या प्रमाणावर जिवंत आहे. या श्रद्धेची मुळे प्राचीन हिंदू ग्रंथांमध्ये आहेत आणि दीर्घकाळ ब्राह्मणांनी त्यांची निर्मिती व प्रसार केला, असा लेखकाचा युक्तिवाद आहे. या ग्रंथांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उत्पीडित जातींना ऐतिहासिक काळात कठोर शिक्षांना सामोरे जावे लागले. या श्रद्धेचा सर्वाधिक फायदा आजही मंदिरातील पुजारी म्हणून असलेल्या ब्राह्मणांच्या जातीय वर्चस्वाला मिळतो, असे लेखकाचे मत आहे. ज्या धर्माप्रती कावडिये निष्ठा व्यक्त करतात, तोच धर्म त्यांच्यापैकी बहुतांश लोकांना मंदिरातील धार्मिक कर्मकांड करण्यासाठी अयोग्य ठरवतो, हा या व्यवस्थेतील विरोधाभास आहे.कावडिये कोण आहेत?दरवर्षी पावसाळ्यात गंगेच्या मैदानांमध्ये लाखो कावडिये गंगा किंवा तिच्या उपनद्यांमधून पाणी घेऊन शिवमंदिरांमध्ये अर्पण करण्यासाठी प्रवास करतात. त्यापैकी बहुतांश जण लेखकाच्या वडिलांप्रमाणे दलित किंवा मागासवर्गीय असतात. ही यात्रा अभिजन वर्गाच्या पसंतीचा धार्मिक विधी नाही. त्यामुळे वर्चस्वशाली जातींमधील अनेक उदारमतवादी हिंदूंना कावडियांच्या पद्धतीबद्दल तिरस्कार वाटतो. या तिरस्कारामागे आपल्या धार्मिक प्रथा श्रेष्ठ असल्याची मानसिकता असल्याचे लेखकाचे निरीक्षण आहे. कावडियांकडे कमी बुद्धिमत्तेचे, बेरोजगार किंवा करण्यासारखे दुसरे काहीही नसलेले लोक म्हणून पाहिले जाते. त्यांच्यावर अव्यवस्था आणि हिंसाचाराचा आरोप केला जातो. मात्र, लेखकाच्या मते हे चित्र अतिशयोक्त आहे. लेखक सांगतो की, त्याच्या वडिलांसोबतची कावड यात्रा करणारी मंडळी शिक्षित आणि मेहनती लोकांची होती. त्यांच्या परिसरातील नियमित कावडिये प्रामुख्याने मागासवर्गीय पुरुष होते. ते स्वतःचे व्यवसाय चालवत आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत. लेखकाच्या वडिलांसाठी आणि त्यांच्या मित्रांसाठी या यात्रेत देवापेक्षा मित्रांचा सहवास अधिक महत्त्वाचा होता. त्याचे वडील फार धार्मिक नव्हते; मात्र मित्र जात असतील तर ते अधूनमधून तीर्थयात्रेला जात. लेखकाच्या अनुभवात, वंचित लोकांसाठी सुट्टी म्हणजे बहुधा तीर्थयात्रा. कारण कामातून सुट्टी घेतल्यास त्याचा अर्थ अनेकदा मजुरी किंवा वेतनाचे नुकसान असा होतो. त्यामुळे मिळालेला मोकळा वेळ देवाच्या सेवेत घालवण्याची इच्छा त्यांच्यात असते. कावड यात्रा आणि नशेचा प्रश्नरस्त्यावर कावडियांकडून होणारा गोंधळ आणि नशेचे सेवन यामुळे त्यांच्याकडे अशांतता निर्माण करणारे लोक म्हणून पाहिले जाते. काही कावडिये नक्कीच या गोष्टींचा अतिरेक करतात; परंतु त्याचे सर्व कावडियांवर सामान्यीकरण करणे योग्य नाही. लेखकाला आठवते की, मंदिराकडे जाणाऱ्या जीपमध्ये भोजपुरी संगीत वाजत होते; परंतु त्यातून कोणताही गोंधळ निर्माण झाला नव्हता. अनेक कावडिये यात्रेदरम्यान गांजाचे सेवन करतात, हेही वास्तव आहे. त्यांच्या दृष्टीने ते भक्तीचा एक प्रकार असू शकतो. गांजा हा शिवाला अर्पण केला जाणारा प्रसाद असल्याचीही धार्मिक धारणा आहे. कावडिये आपल्या या कृतीचे समर्थन करताना म्हणतात की, शिवाचे अनुयायी असल्याने त्यांनी शिवासारखेच वर्तन केले पाहिजे. अर्थात, ते नियमितपणे नशा करणारे असतातच असे नाही. मात्र, लेखकाचे म्हणणे स्पष्ट आहे की, उदारमतवादी हिंदूंच्या तिरस्कारापासून कावड यात्रेचे समर्थन करणे हा त्याचा उद्देश नाही. उच्चवर्गीय हिंदूंच्या नजरेत सन्मान मिळवल्याने उत्पीडित जातींच्या कावडियांना खरा सन्मान मिळणार नाही. आत्मसन्मानाचा मार्ग म्हणजे ब्राह्मणवादी श्रद्धा आणि सत्तेवर आधारलेल्या अशा धार्मिक प्रथा नाकारणे, ज्या उत्पीडित लोकांना स्वतःच्या जातीय शोषणातच सहभागी करून घेतात.कावड यात्रा : धार्मिक श्रद्धा की जातिव्यवस्थेचे पुनरुत्पादन?कावड यात्रेची वाढती लोकप्रियता ही विविध सरकारांकडून मिळणाऱ्या मदतीशीही संबंधित आहे. हरिद्वारमध्ये उत्तराखंड सरकार दरवर्षी सार्वजनिक खर्चातून कावड मेळ्याचे आयोजन करते. पश्चिम बंगाल सरकारही जानेवारी महिन्यात गंगासागर येथे अशाच प्रकारच्या धार्मिक आयोजनाला प्रोत्साहन देते. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने कावड यात्रेकरूंच्या सेवेसाठी राज्य प्रशासनाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. त्यांना सुरक्षा पुरवण्यात आली आणि एका प्रमुख महामार्गाच्या दोन मार्गिका त्यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आल्या. हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या अनेक सरकारांनी आणि राजकीय पक्षांनी कावड यात्रेचा उपयोग हिंदू धर्माच्या शक्ती आणि गौरवाचे प्रदर्शन करण्यासाठी केला आहे. लेखकाच्या मते, हिंदुत्वाच्या चौकटीतून पाहिल्यास ही प्रक्रिया उत्पीडित जातींकडून वर्चस्वशाली जातींचे आध्यात्मिक आणि राजकीय वर्चस्व स्वीकारून घेण्याचे काम करते. लेखकाच्या मते, कावड यात्रा ही दलितांसाठी ब्राह्मणवादी हितसंबंधांनी निर्माण केलेला एक सापळा आहे.आंबेडकरी विचारांकडे वाटचाललेखक सांगतो की, तो स्वतःही गंगा जल पवित्र आणि शुद्ध असते, या विश्वासासह हिंदू धार्मिक संस्कारांमध्ये वाढला. त्याचे आजोबा मृत्यूशय्येवर असताना, त्यांच्या आत्म्याला स्वर्गप्राप्ती व्हावी या विश्वासाने त्याच्या आई-वडिलांनी त्यांना गंगेचे पाणी पाजले होते. अनेक उत्पीडित जातींच्या कुटुंबांमध्ये अशाच धार्मिक कारणांसाठी गंगाजल घरात ठेवले जाते. मात्र, आता लेखक अशा अंधश्रद्धाळू समजुतींवर विश्वास ठेवत नाही. बराबर टेकडीवर चढणारा तो लहान मुलगा आणि हा लेख लिहिणारा प्रौढ यांच्यामध्ये विद्यापीठातील शिक्षण, पत्रकारितेतील अनेक वर्षांचा कठीण अनुभव आणि दलित म्हणून स्वतःच्या ओळखीला समजून घेण्याची दीर्घ प्रक्रिया आहे. या प्रवासात त्याने भेदभावाचे अनेक अनुभव घेतले. जात हीच ज्यांच्या जीवनातील वास्तवाची सर्वात निर्णायक बाब आहे, अशा वंचित लोकांच्या हिंसा, अभाव आणि वेदनांशी त्याचा संबंध आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन वाचल्यानंतर आणि त्यांनी सांगितलेले वास्तव स्वीकारल्यानंतर लेखकाचे विचार अधिक स्पष्ट झाले. दलित म्हणून आपण हिंदू समाजापासून नेहमीच वेगळे आणि पृथक् राहिलो आहोत, अशी त्याची धारणा दृढ झाली. त्यानंतर त्याने कावड यात्रा किंवा इतर कोणत्याही हिंदू धार्मिक विधींमध्ये सहभागी होणे बंद केले.डॉ. आंबेडकरांचे हिंदू धर्म आणि जातिव्यवस्थेबाबतचे विचारआंबेडकरांनी हिंदू धर्माविषयी लिहिताना त्याच्या जातिव्यवस्थेवर कठोर टीका केली. त्यांच्या मते, हिंदू धर्म हा श्रेणीबद्ध समाजरचनेवर आधारलेला आहे. या व्यवस्थेत समाजातील विविध घटकांना वेगवेगळ्या पातळ्यांवर स्वातंत्र्य आणि दडपशाही प्राप्त होते. जात आणि अस्पृश्यता या केवळ धार्मिक तत्त्वज्ञानातील संकल्पना नाहीत. त्या प्रत्येक हिंदूने आपल्या दैनंदिन जीवनात पाळाव्यात, अशी आचारसंहिता बनल्या आहेत. त्यामुळे जात आणि अस्पृश्यतेवर केवळ विश्वास ठेवणे पुरेसे नसून, त्यांचे आचरणही केले जाते. आंबेडकरांच्या मते, दलितांचा हिंदू धर्माशी असलेला संबंध हा मुख्यतः या सामाजिक व्यवस्थेत त्यांच्या स्थानामुळे निर्माण झाला आहे. याचा अर्थ दलित हिंदू समाजाच्या समान आणि अविभाज्य घटकांप्रमाणे स्वीकारले गेले आहेत, असा होत नाही. जात आणि अस्पृश्यता या हिंदू सामाजिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. दलितांना हिंदू समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वेगळे ठेवण्यासाठी आंतरजातीय विवाह आणि सहभोजनावरील निर्बंध हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. लोकांना एकाच धर्माशी जोडून ठेवणारी गोष्ट केवळ समान देवतांची पूजा किंवा धार्मिक विधींमध्ये सहभाग नसतो; तर त्यांच्यातील सामाजिक एकात्मता अधिक महत्त्वाची असते. दलितांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व याच पार्श्वभूमीवर भारत सरकार अधिनियम, १९३५ मध्ये दलितांना स्वतंत्र राजकीय अल्पसंख्याक म्हणून मान्यता देण्यात आली होती. मात्र, वर्चस्वशाली जातीतील हिंदू नेत्यांनी दलित हे हिंदूच आहेत, त्यामुळे त्यांना स्वतंत्र राजकीय दर्जा किंवा विशेष अधिकार देण्याची गरज नाही, असा युक्तिवाद केला. याच प्रश्नावर महात्मा गांधींनी डॉ. आंबेडकरांवर तडजोड करण्यासाठी दबाव आणला आणि उपोषण केले. लेखकाच्या मते, आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र राजकीय दर्जा आणि प्रतिनिधित्वासाठी संघर्ष केला नसता, तर स्वातंत्र्यानंतर संविधानात दलितांसाठी करण्यात आलेल्या संरक्षणात्मक तरतुदींनाही कदाचित स्थान मिळाले नसते. त्यामुळे लेखकाचा युक्तिवाद असा आहे की, कावड यात्रा किंवा कोणत्याही हिंदू धार्मिक प्रथेत सहभागी होणे म्हणजे आंबेडकरांच्या संघर्षाशी प्रतारणा करणे आणि आपल्या नागरिक व राजकीय अधिकारांना कमकुवत करण्यास हातभार लावणे होय. शिव, ब्राह्मणवाद आणि धर्मांतरआंबेडकरांनी असेही नमूद केले आहे की, शिव हे वैदिक देवता नव्हते आणि एका काळी ब्राह्मणांकडून त्यांना तुच्छ लेखले जात होते. परंतु पुढे ब्राह्मणांनी शिवाला आपल्या  र्मिक व्यवस्थेत समाविष्ट करून त्यांच्या पंथावर नियंत्रण प्रस्थापित केले. लेखकाच्या मते, दलितांनी हे नियंत्रण नाकारले नाही, तर ते त्याच्या अधीनच राहतील. मात्र, हा प्रश्न उभा राहतो की, दलित भक्तांनी मग काय करावे? विशेषाधिकारप्राप्त आणि श्रीमंत लोकांसाठी नास्तिकता स्वीकारणे तुलनेने सोपे असते. परंतु ज्यांच्याकडे अन्न, निवारा आणि चांगल्या जीवनासाठी प्रार्थना करण्याव्यतिरिक्त दुसरा आधार नाही, त्यांच्यासाठी नास्तिकता सहज उपलब्ध पर्याय नसतो. आंबेडकरांना धर्माची ही सामाजिक गरज समजत होती. म्हणून त्यांनी धर्माची गरज नाकारली नाही; उलट त्यांनी विविध धर्मांची चिकित्सक कसोटी लावली. समानता आणि विवेकवादाच्या निकषांवर खरा उतरणारा, तसेच केवळ पूर्वजन्म किंवा परलोकाबद्दल चर्चा न करता वर्तमान जीवनातील समस्यांवर भर देणारा धर्म त्यांनी शोधला. या शोधातून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि हजारो दलितांना बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी प्रेरित केले. मुक्तीचा मार्ग लेखकाच्या मते, दलितांसाठी प्रतिष्ठा, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्याचा मार्ग कावड यात्रेपासून दूर जाण्यातच आहे. दलितांना बहुजन म्हणून संघटित करणारे नेते कांशीराम यांनी एकदा देशभरातील लोकांना दोन्ही खांद्यांवर पाण्याची पात्रे घेऊन कावड यात्रा करताना पाहिले. ते दृश्य पाहून त्यांनी आपले दु:ख व्यक्त करत म्हटले होते, “मला असे वाटते की हे लोक आपल्या खांद्यावर मनुवाद वाहून नेत आहेत. आपल्याला हे ओझे झुगारून द्यावे लागेल.” कावड यात्रा ही केवळ धार्मिक यात्रा म्हणून पाहण्याऐवजी तिच्यामागील सामाजिक, जातीय आणि राजकीय वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. लेखकाच्या मते, दलितांच्या मुक्तीसाठी आवश्यक असलेला मार्ग हा आत्मसन्मान, समता, विवेकवाद आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने जाणारा असला पाहिजे. त्यामुळे दलितांनी अशा धार्मिक प्रथा आणि श्रद्धांचा चिकित्सक पुनर्विचार करणे गरजेचे आहे, ज्या त्यांच्या सामाजिक अधीनतेला कायम ठेवतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश याच ठिकाणी महत्त्वाचा ठरतो—मुक्ती ही केवळ राजकीय किंवा आर्थिक बदलातून मिळत नाही; ती सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीच्या नकारातूनही साध्य करावी लागते.


**लेखक : पत्रकार सागर, हे 'द कारवाँ' (The Caravan) चे ज्येष्ठ लेखक आहेत.**

**अनुवाद: प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवले महाविद्यालय, जालना.**



**पूर्व प्रसिद्धी : 'द कारवाँ'**